# मेट्रोत मराठी भाषा पंधरवडा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सांगता समारोप नुकताच पार पडला. यावेळी कॉलनीचे लेखक सिद्धार्थ पारधे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पारधे यांनी आपल्या जीवनातील अनुभव सांगितले तसेच त्यांना आत्मचरित्र लिहिण्यास कशामुळे प्रोत्साहन मिळाले याविषयीही माहिती दिली. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित स्पर्धांमध्ये मराठी आणि अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांनी भाग घेतल्याबद्दल संचालक एस.के. गुप्ता यांनी कौतुक केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेत दयानंद चिंचोलीकर, गणेश घुले, नभा शिरोडकर व गौरी कार्तिकेय यांना पुरस्कार मिळाला. घोषवाक्य स्पर्धेत रेखा माझिरे, नूपुर चित्ते, सागर खोलमकर, ज्योती नायर यांनी शुध्दलेखन स्पर्धेत आफरीन शेख, नीती तामसे, नभा शिरोडकर, प्रीता नायर यांनी शब्दकोडे स्पर्धेत गणेश पाटील, सुप्रिया मोरे, अश्विनी साळुंखे, नाजनीन शेख यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेत योगेंद्र मोरे, मयूर कदम , अमित जांभळे, अर्शद नसीम यांनी पुरस्कार मिळवले.